

# हितोपदेश

मेधा मराठे






**हितोपदेश**



© सुरक्षित



**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.



**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-




# अनुक्रमणिका


१. एकतेचे महत्त्व १०
२. अतिलोभ घेई प्राण १२
३. मैत्रीतून आत्मनाश २०
४. दुष्टाशी मैत्री, मृत्यूशी गाठ ! २२
५. अति लोभ करी नाश ३३
६. अति हाव धरून नये ३७
७. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ४१
८. सुहृदभेद – मैत्रीत फूट ४६
९. लोभी वर्धमान आणि संजीवन बैल ४७
१०. आगाऊपणा भोवला ५१
११. प्रत्येकाने आपले अधिकार... ५३
१२. गरज असेल तरच महत्त्व ५८
१३. बाह्य स्वरूपाला घाबरू नये... ६१
१४. बुद्धी हीच शक्ती ६६
१५. बुद्धीचे बळ ६७
१६. दुर्बलाचे सामर्थ्य ७२
१७. विग्रह – युद्ध ७८
१८. हंस व मोर यांचे युद्ध ७९
१९. मूर्खांना उपदेश करू नये ८१
२०. व्यर्थ बोलण्याने अनर्थ ओढवतो ८३
२१. मोठं नाव मोठं काम ८५
२२. दुर्जनांची संगत म्हणजे मरणच ९०
२३. दुष्टाचा सहवास टाळावा ९२
२४. स्वपक्ष सोडणारा दुसऱ्या... ९७
२५. प्रसंगी आगंतुक आपले होतात १०३
२६. खोट्या कल्पनेत राहणारा... १०८
२७. आत्मनाश ११६
२८. हितचिंतक भाग्याने मिळतो ११८
२९. दैवावर विसंबला तो संपला १२०
३०. उपाय करताना अपायाचा... १२२
३१. नीचाला मोठे पद देऊ नये १२५
३२. जन्मत:चा नीच, नीचच राहतो १२७
३३. भविष्यातील कल्पनेने हुरळू नये १३०
३४. तुल्यबळाशी तह करावा... १३३
३५. सज्जनाचा सरळ स्वभाव... १३८
३६. गोड बोलून सज्जनाची फसवणूक १४०
३७. दुष्टाचं गोड बोलणं खोटं असतं १४४
३८. क्रोधाच्या आहारी जाऊ नये १४८





# हितोपदेश

ज्ञानसंपन्न, तेजस्वी असे नारायण पंडित वटवृक्षाच्या सावलीत आपल्या विद्यार्थ्यांसमोर बसले होते. त्यांच्या समोर बसलेले त्यांचे शिष्य मोठ्या उत्सुकतेने आपले गुरू काय सांगतात ते ऐकत होते. आज गुरू विद्येचे महत्त्व सांगत होते. विद्यार्थी वयाने लहान असले तरी त्यांना याच वेळी विद्येचं महत्त्व पटणं आवश्यक आहे असं गुरू नारायण पंडितांना वाटलं. कारण मातीचा घडा ओला असताना म्हणजे आगीत भाजण्यापूर्वी त्यावर नक्षीकाम केलं तरच ते कायम टिकतं. तसंच लहान मुलांचं मन हे ओल्या घड्याप्रमाणे असतं. त्यावेळी त्यांच्या मनावर केलेले संस्कार जन्मभर टिकून राहतात.

एक शिष्य उठून उभा राहिला आणि गुरूंना वंदन करून म्हणाला, ''गुरुजी, विद्या का मिळवायची ?'' यावर नारायण पंडित म्हणाले,

''बाळा विद्या मिळवली तर माणसाला सगळ्या गोष्टी आपोआप मिळतात. विद्यावान् माणूस विनयशील होतो. विनयशील माणूस कार्यकुशल होतो. कार्यकुशल माणसाला धन म्हणजे संपत्ती मिळते. धन मिळाले की माणूस धर्मानुसार वागतो व पुण्यवान होतो. पुण्यवान माणसालाच संसारातील सुखं, समृद्धी, प्रतिष्ठा प्राप्त होते. हे विद्याधन चोर चोरू शकत नाही. दुसऱ्याला दिलं तर ते वाढतं. कमी मात्र होत नाही. माणसानं ते मिळवायचा नेहमी प्रयत्न करावा. विद्या मिळविलेल्या माणसाला सन्मान मिळतो. विद्या न मिळविलेल्या माणसाला सगळी हसतात – मग तो कितीही श्रीमंत असेना.''



पुन्हा शिष्याने विचारलं, ''गुरुजी, हे विद्याधन कसं मिळवायचं?''


गुरुजी म्हणाले, ''अजराऽमरवत् प्राज्ञो विद्यामर्थं च चिन्तयेत् ।
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाच रेत् ।।

(विद्या आणि धन मिळविताना आपण कधी म्हातारे होणार नाही, आपल्याला मृत्यू येणार नाही असंच शहाणा माणूस समजतो. म्हणजे मृत्यूचा विचार न करता अखंड विद्या मिळविण्याच्या मागे लागावं. धर्मकार्य करताना मात्र मृत्यू येणार हे लक्षात घेऊन वेळच्या वेळी करावं असा या सुभाषिताचा अर्थ आहे.) ज्ञानी लोकांनी सुभाषितांच्या रूपाने अनेक महत्त्वाचे उपदेश आपल्याला केले आहेत. ते लक्षात घ्या आणि ज्ञान मिळविण्यासाठी लहानपणापासूनच प्रयत्न करा.''

दुसरा शिष्य उठून उभा राहिला. गुरूंना नमस्कार करून म्हणाला, ''गुरुजी, ज्ञान का मिळवायचं आणि कसं मिळवायचं ते आम्हाला समजलं. तुम्ही आम्हाला केव्हा शिकवायला सुरुवात करणार आहात ?'' गुरू नारायण पंडितांना आनंद झाला. ते म्हणाले,

''मुलांनो ! या जगात दोन प्रकारच्या विद्या प्रसिद्ध आहेत. एक शस्त्रविद्या आणि दुसरी शास्त्रविद्या. शस्त्रविद्या म्हणजे शस्त्राने लढण्याची कला. या कलेमुळे माणसाचं रक्षण होतं. तरी नेहमी तीच उपयोग करता येत नाही. म्हातारपणामुळे लढता येत नाही. उलट शास्त्रविद्या मिळाल्यावर माणूस सगळ्या प्रसंगी आपले रक्षण करू शकतो. आपल्या देशात महाभारत, पंचतंत्र असे बरेच ग्रंथ आपल्या पूर्वजांनी लिहिलेले आहेत. त्यात अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत. त्या गोष्टी ऐकून समजून घेतल्या तर माणसाला शहाणपण येतं. कसं वागावं, बोलावं ते समजतं. म्हणून मी पूर्वीच्या ग्रंथातील उत्तम गोष्टी निवडून एकत्र करून 'हितोपदेश' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याचे चार भाग आहेत. मित्रलाभ, सुहृद् भेद, विग्रह आणि संधी अशी त्याची चार प्रकरणे आहेत. प्रत्येक प्रकरणात गोष्टी आणि सुभाषिते आहेत. त्या ऐकून तुमचं हित म्हणजे कल्याण होईल. हा तुमच्या हितासाठी केलेला उपदेश आहे. तेव्हा आता 'हितोपदेश' या ग्रंथाच्या पहिल्या म्हणजे 'मित्रलाभ ' – मित्र कसे मिळवावे' या प्रकरणाला सुरुवात करतो.''

शिष्य मोठ्या उत्सुकतेने गोष्टी ऐकण्यासाठी पुढे सरसावले. गोष्टी सांगितल्या तर मुलांना शिकताना कंटाळा येणार नाही हे गुरूंना माहीत होतं. नारायण पंडित पुढे बोलू लागले – ''मी ज्या गोष्टी तुम्हाला सांगणार आहे त्या कोणी कोणाला सांगितल्या होत्या ते आधी सांगतो. गंगा नदीच्या किनारी 'पाटलीपुत्र' नावाचं नगर होतं. तिथे पूर्वी 'सुदर्शन' नावाचा राजा राज्य करीत होता. हा राजा पराक्रमी आणि गुणी होता. आपल्या प्रजेची – नागरिकांची तो काळजी घ्यायचा. त्यांचं शत्रूपासून रक्षण करायचा. एकदा सुदर्शन राजा रस्त्याने चालला असता जवळच असलेल्या



एका घरातून त्याला आवाज आला. एक मुलगा मोठमोठ्याने अभ्यास करत होता. राजाच्या कानावर त्यातील दोन सुभाषितं पडली.

अनेक संशयोच्छेदि परोक्षार्थस्य दर्शकम् ।
सर्वस्य लोचनं शास्त्रं यस्य नास्त्यन्ध एव सः ।।

(माणसाला समोरचं डोळ्यांनी दिसतं; पण डोळ्यांनी न दिसणाऱ्या गोष्टी माणसाला शास्त्र म्हणजे ज्ञान मिळाल्याने कळतात. मनातील शंका दूर होतात. शास्त्रांचे ज्ञान मिळविणे हाच माणसाचा खरा डोळा आहे. शास्त्र जो शिकला नाही त्याला डोळे असले तरी आंधळाच म्हणावं.)

सुदर्शन राजाने हे सुभाषित ऐकलं व तो विचार करू लागला. राजाला चार मुलं होती; पण त्यांनी कोणत्याही शास्त्राचा अभ्यास केला नव्हता. त्यामुळे ते आंधळे असल्यासारखेच होते. राजाला वाईट वाटलं. राजाने आणखी एक सुभाषित ऐकलं.


यौवनं धनसंपत्ति: प्रभुत्वमविवेकता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।।

(तरुण वय, पैसा, अधिकार आणि अविचार यांपैकी एखादी गोष्ट जरी माणसाजवळ असेल तरी अनर्थ होतो. मग जर चारही गोष्टी एखाद्या माणसात असतील तर मग किती अनर्थ होईल ?)

सुदर्शन राजाच्या लक्षात आलं की आपली मुलं कोणतीही शास्त्रं शिकली नाहीतच शिवाय ती तरुणआहेत. त्यांच्याजवळ पैसा व अधिकार आहे. कारण ते राजपुत्र आहेत. कोणतीही विद्या मिळविलेली नसल्याने ते अविचारी आहेत. सगळ्या वाईट गोष्टी त्यांच्यात एकत्र झाल्या आहेत. त्यामुळे ते राज्यकारभार करू शकणार नाहीत. उलट आळसात, चैन करण्यात आयुष्य घालवतील. तेव्हा त्यांना शास्त्र कसं शिकवावं, ज्ञान कसं द्यावं अशी चिंता राजाला पडली. राजानं असंही एक सुभाषित ऐकलं होतं की शंभर मूर्ख मुलं असून काय उपयोग ! त्यापेक्षा एकच गुणवान मुलगा असणं चांगलं. आकाशात चांदण्या असल्या तरी एकट्या चंद्राचा प्रकाश जास्त पडतो. तेव्हा माझ्या मुलांना मी गुणवान् कसं बरं करू?

सुदर्शन राजा विचार करू लागला–

'आपल्या मुलांना विद्या शिकविण्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत. नुसती इच्छा करून मुले विद्या शिकणार नाहीत. चांगल्या बांबूपासून बनविलेलं धनुष्य दोरी अडकवून सिद्ध केलं जात नाही तोपर्यंत त्याचा काय उपयोग ? मनुष्य श्रेष्ठ कुळात जन्मला तरी विद्या शिकला नाही तर तो आयुष्यभर काहीही काम करू शकणार नाही. तसं म्हटलं तर माणसं आणि पशू सगळीच खातात, झोपतात, घाबरतात, भोग भोगतात; पण माणसं पशूंपेक्षा वेगळी ठरतात ती ज्ञान मिळविल्याने. तशीच माझी मुलं अशी अडाणी, ऐदी आहेत याचे कारण माझे दैव असं म्हणण्यात अर्थ नाही.



ज्यांच्या अंगात कर्तृत्व आहे ते दैवावर अवलंबून न राहता प्रयत्नाने पाहिजे ते मिळवतात असं म्हटलेलंच आहे.


उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशान्ति मुखे मृगः ।।

(प्रयत्न केला तरच आपले मनोरथ पूर्ण होतात. झोपलेल्या सिंहाच्या तोंडात आपोआप शिकार येऊन पडत नाही.)

मुलांना विद्या शिकविण्याची जबाबदारी आई–वडिलांची असते. तेव्हा राजपुत्रांना शिकविण्याची जबाबदारी माझीच आहे.' असा निश्चय करून राजा राजवाड्यात परतला. त्याने लगेच पंडितांची सभा बोलविली. सभा भरल्यावर राजा म्हणाला, ''माननीय पंडितहो ! माझी तुम्हाला एक विनंती आहे. माझी मुलं अडाणी आहेत. कोणतीही विद्या, कला ती शिकलेली नाहीत. ती फक्त ऐषआराम करतात. अशा माझ्या मुलांनी विद्वान व्हावं असं मला वाटतं. ते काम करायला तुमच्यापैकी कोणी तयार आहे का ? त्यांना नीतीशास्त्र शिकवून पंडित झालेलं मला पाहायचंय.''

राजाच्या दरबारात अनेक विद्वान होते. ते वेगवेगळ्या विषयांत पारंगत होते. त्यांनी राजाच्या मुलांबद्दल आणि त्यांच्या उनाडपणाबद्दल ऐकलं होतं. त्यामुळे कोणी पुढे होईना. राजा निराश झाला. इतक्यात विष्णुशर्मा नावाचा पंडित उभा राहिला. तो अतिशय हुशार आणि नीतिशास्त्र म्हणजे 'वागावे कसे' याचे मार्गदर्शन करणारे शास्त्र जाणणारा होता. विष्णुशर्मा म्हणाला – ''महाराज, आपण बुद्धिवान आणि सद्गुणी आहात. तेव्हा आपले पुत्र मूर्ख आणि गुणहीन नसणार. कारण रत्नांच्या खाणीत रत्नेच उत्पन्न होतात. काच नाही. मी आपल्या मुलांना शिकवीन आणि सहा महिन्यांत नीतिशास्त्रसंपन्न करीन. आपण चिंता करू नये.'' पंडित विष्णुशर्माचे हे बोलणे ऐकून सुदर्शन राजाला आनंद झाला.





तो म्हणाला, ''पंडितजी ! तुमच्या सहवासात राहून माझी मूर्ख मुलं तुमच्यासारखी विद्वान आणि गुणवान होतील हे नक्की. तुम्हीच माझ्या मुलांना नीतिशास्त्र शिकवायला योग्य आहात.'' असे म्हणून राजाने आपल्या मूर्ख मुलांना विद्वान् विष्णुशर्मा यांच्या हाती सोपविले.

राजपुत्रांचं शिक्षण सुरू झालं. पंडित विष्णुशर्मा रोज त्यांना शिकवायला राजवाड्यात जाऊ लागले. पहिल्या दिवशी राजवाड्याच्या गच्चीवरील गाद्या–गिरद्यांवर राजपुत्र लोळत होते. तेथे पंडित विष्णुशर्मा गेले. राजपुत्रांना काही शिकायची उत्सुकता नव्हतीच. विष्णुशर्मा म्हणाले, ''मुलांनो ! तुम्ही बुद्धिवान् आहात. थोर लोक असं म्हणतात –

काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।
व्यसनेन च मूर्खाणां निद्र्या कलहेन वा ।।

(बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य–शास्त्रांचा आनंद घेण्यात जातो. उलट मूर्ख माणसांचा वेळ झोप, भांडणं आणि व्यसनात जातो.)


'बुद्धिवान' असं म्हटल्यावर राजपुत्रांना बरं वाटलं. ते सावरून बसले. पंडित विष्णुशर्मा काय बोलतात याकडे लक्ष देऊ लागले. विष्णुशर्मांनी राजपुत्रांना बुद्धिमान आणि मूर्ख लोक यातील फरक समजावून सांगितला. ते पुढे म्हणाले – ''राजपुत्रांनो । तुम्ही बुद्धिमान असल्याने तुम्हाला नक्कीच वेगवेगळी शास्त्रे शिकणे आवडेल; पण तुम्हाला मी ती लहान लहान गोष्टी सांगून शिकविणार आहे.'' गोष्टी ऐकण्याची उत्सुकता राजपुत्रांना वाटू लागली.

ते म्हणाले, ''गुरुजी, सांगा. सांगा गुरुजी, कधी एकदा गोष्टी ऐकतो असं झालं आहे.''

विष्णुशर्मा म्हणाले – ''मी तुम्हाला चांगले मित्र कसे मिळवावे, मित्रांशी कसं वागावं हे शिकविणाऱ्या गोष्टी सांगणार आहे. मित्र मिळविणे म्हणजे मित्रलाभ. एक कावळा, एक कासव, एक हरीण आणि एक उंदीर या चौघांकडे काहीही धन नव्हते. कोणतेही साधन नव्हते; पण आपल्या बुद्धिमत्तेच्या तसेच मैत्रीच्या जोरावर त्यांनी मोठ्या संकटातून मार्ग काढले. कठीण कामे पार पाडली. या गोष्टींपासून तुम्ही बोध काय घ्यायचा याचा विचार करा.''

आता मात्र राजपुत्रांची उत्सुकता खूपच ताणली गेली होती. ते म्हणाले, ''गुरुजी, या चौघांची गोष्ट लवकर सांगा. कशी काय त्यांनी असाध्य गोष्ट करून दाखविली ?'' विष्णुशर्मा सांगू लागले –

✦✦



# एकतेचे महत्त्व

गोदावरी नदीच्या काठी एक मोठ्ठं सावरीचं झाड होतं. त्या झाडावर चारही दिशांनी पक्षी येत आणि रात्रीच्या वेळी त्या झाडावर राहात. पहाट होऊन सूर्य उगवताच ते पक्षी पुन्हा खाणं-पाणी शोधण्यासाठी दूर उडून जात. त्या वेगवेगळ्या जातीच्या पक्ष्यांमध्ये 'लघुपतनक' नावाचा कावळाही होता. तोही रोज रात्री त्या सावरीच्या झाडावर विश्रांती घ्यायचा.

एके दिवशी उजाडल्यावर लघुपतनकाने डोळे उघडून सगळीकडे पाहिलं. तो आता आकाशात उडणार एवढ्यात त्याने एका पारध्याला हातात जाळे घेऊन झाडाकडे येताना पाहिले. तो पारधी अगदी यमासारखा भयंकर दिसत होता. सकाळी सकाळीच त्या शिकारी पारध्याचं दर्शन झाल्याने लघुपतनक कावळ्याला वाईट वाटलं; पण त्याने असा विचार केला – 'या जगात स्वत:चं संरक्षण करायचं असेल तर शहाणी व्यक्ती नेहमी उद्या येणाऱ्या मृत्यू, शोक किंवा दु:खाची आठवण ठेवून ते प्रयत्नपूर्वक दूर ठेवण्याचा प्रयत्न करते. मूर्ख व्यक्तीच त्याचं दु:ख करत राहते. तेव्हा या शिकारी पारध्याची भीती वाटून न घेता मी तो जाळं घेऊन काय करतो ते

